# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.३१०/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विकास सुधाकर गोमसाळे, रा.१५६, बाहुबली नगर, साक्री रोड, धुळे, ता.जि. धुळे | कार्यालय अधिक्षक, आस्थापना विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे, ता.जि. धुळे | सहाय्यक आयुक्त (आस्थापना), धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे, ता.जि. धुळे |

**सुनावणी दिनांक — २२/०७/२०२५**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १७/१२/२०२१

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत मुदतीत माहिती दिलेली नाही. माहिती पुरविण्यास हेतू पुरस्पर टाळाटाळ केल्याचे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वेळेवर सुनावणी घेतली नाही. वेळेवर निर्णय पारित केलेला नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी व सकारात्मक कार्यवाही न करता माहिती पुरविण्यास हेतु पुरस्पर टाळाटाळ केल्याचे दिसून येते.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवर शिस्तभंग व कर्तव्यात कसुर केल्याबाबत सेवानियमान्वये सेवापुस्तीकेत नोंद घेण्याची शिफारस करावी. जन माहिती अधिकारी यांचेवर रु. २५,०००/- शास्ती करावी. मला रु.३०००/- नुकसान भरपाई मिळावी. माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १९/०४/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९/०४/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०२१

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१) दि.०९/०४/२०२१ दुपारी ४.०० ते ५.३० वाजेपर्यंतची श्री. गणेशा हॉस्पीटलचे सी.सी.टी.व्ही. फुटेज साक्षांकित करुन मिळावे. (२) दि.१०/०४/२०२१ दुपारी ५.०० ते रात्री ९.३० वाजेपर्यंतची श्री गणेशा

हॉस्पीटलचे सी.सी.टी.व्ही फुटेज साक्षांकित करुन मिळावे. (३) शासन आदेशानुसार श्री गणेशा हॉस्पीटल देवपूर, धुळे मधील एकूण किती कोविड रुग्णांनी धुळे महानगरपालिकेकडे तक्रारींची नोंद आहे. नोंद असल्यास त्याचे साक्षांकित प्रती मिळाव्यात. तसेच तक्रारीचे निवारण झाले असल्यास त्याबाबत माहिती साक्षांकित करुन मिळावी. (४) शासन आदेशानुसार धुळे जिह्यातील कोविड संदर्भात एकूण किती रुग्णांनी खाजगी हॉस्पीटलची धुळे महानगरपालिकेकडे तक्रारी आल्या आहेत. त्याच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. तसेच तक्रारीचे निवारण झाले असल्यास त्याबाबत माहिती साक्षांकित करुन मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आस्थापना विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | २४/०५/२०२१ |
| (२) प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २४/०५/२०२१ |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. |

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (आस्थापना), धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांनी कोणतेही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) अपीलार्थी - अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचे सुनावणी दरम्यान स्पष्ट केले.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आस्थापना विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (आस्थापना), धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे हे द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित असल्याचे दिसून येते.

**६. निष्कर्ष –**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आस्थापना विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (आस्थापना), धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांनी कोणतेही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

३) अपीलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज कोव्हीड कालावधीतील असल्याने ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आस्थापना विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या दिनांक १९/०४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात वैयक्तीक स्वरुपाची माहिती व जी माहिती माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ८ द्वारे देणे बंधनकारक नाही ती माहिती वगळून जी माहिती कार्यालयातील उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपीलार्थी यांना पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आस्थापना विभाग, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.



राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

३. आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारित न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ.) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र. केमाअर्ज – २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहीले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

५. प्रस्तुत व्दितीय अपिल क्र.३१०/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग

प्रत :- माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी
आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे, ता.जि. धुळे

जावक क्र. ८८८२ दिनांक : 19 NOV 2025

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक